Review of Literature
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN: 2347-2723 Impact Factor : 2.0210(UIF) Volume - 3 | Issue - 8 | March - 2016

# सविनय कायदेभंग चळवळी दरम्यान भंडारा जिल्हयातील जंगल सत्याग्रह



डॉ. ज्ञानेश्वर शामराव कडव
इतिहास विभाग प्रमुख,
ज. मु. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा.

**सारांश :—**

ब्रिटिश कालखंडात भंडारा जिल्हा मध्यप्रांताचा भाग होता. हा जिल्हा मागासलेला म्हणून ओळखल्या जात होता. पण तलाव व जंगलांसाठी प्रसिध्द होता. भारतीय स्वांतत्र्य चळावळीत या जिल्हयाने सक्रिय भूमीका पार पाडली. विशेषतः लोकमान्य टिळकांच्या काळापासून या जिल्हयातील सर्वसामान्य शेतकरी, मजूर, उद्योजक, शिक्षित, विभिन्न व्यावसायीक भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने सूरू केलेल्या चळवळीत सामील झाले होते. कॉंग्रेसचा कार्यक्रम या जिल्हयात ही हिरहिरीने राबविला गेला. महात्मा गांधीनी घोषीत केलेल्या 1930 च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा एक भाग म्हणून भंडारा जिल्हयात जंगल सत्याग्रह करण्यात आला. आठ सत्याग्रहांचे आयोजन करण्यात आले. या सत्याग्रहात अनेक नागरीक, स्त्रिया सामील झाल्या होत्या. त्याची दखल ब्रिटिश शासनाला घ्यावी लागली होती. मात्र या जंगल सत्याग्रहाचा इतिहास सलग प्रसिध्द न झाल्याकारणाने नवीन पिढीला, त्याविषयी माहिती प्राप्त होऊ शकली नाही. ती व्हावी व स्वांत्र्य चळवळीतील भंडारा जिल्हयाच्या योगदानाचे महत्व कळावे या करिता सदर शोध निबंध सादर करीत आहे.

**वृतांत :—**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या प्रत्येक कार्यात भंडारा जिल्हयातील अनेक व्यक्ति सक्रिय रूपाने सहभागी होत होत्या. कॉंग्रेसच्या अधिवेशनाला उपस्थित राहण्याबरोबरच त्या अधिवेशनात होणाऱ्या निर्णयांची व कार्यक्रमाची अंमलबजावणी या जिल्हयात होत असे.

होमरूल, असहकार चळवळ केल्या गेली होती. 1929 च्या लाहोर अधिवेशनात ही भंडारा जिल्हयातील गणपतलाल पांडे, चर्तुभूज जसानी, ॲड. तनखीवाले, ॲड. टेंभेकर, जोगळेकर, कर्मवीर पाठक, दामले गुरूजी, माकडे, जगन्नाथ पटवर्धन इत्यादी सामील झाले होते.[1]

महात्मा गांधींनी 1930 मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ सूरू करण्याचा निर्णय घोषीत केला होता. त्या निर्णयानुसार भंडारा जिल्हयातही कायदेभंग चळवळ सूरू करण्यात आली होती. या चळवळीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जंगल सत्याग्रह सूरू करण्यात आला होता. त्याचा वृतांत पुढील प्रमाणे.

### *चिंचोलीचा जंगल सत्याग्रह :–*

मध्यप्रातांच्या विशाल जंगलावर सरकारने ''वनराई'' कर लावला होता. त्याचा परिणाम भंडारा जिल्हयातील तरूणांवर झाला. 30 जुलै 1930 रोजी कर्मवरी बापूसाहेब पाठक यांच्या अध्यक्षेतेखाली व श्री. बळीरामप्रत निमगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंदिया ला सभा घेण्यात आली. सरकारी अधिकारी व पोलिसांच्या अत्याचाराचा तीव्र निषेध करून सत्याग्रहाची योजना आखण्यात आली.[2] त्यासाठी युध्दमंडळ स्थापन करण्यात आले.[3]

### *पहिले युध्दमंडळ :–*

डिस्टेटर– श्री. चतुर्भुज जसानी
मंत्री – श्री. मोरश्वर दामले
सेनापती– श्री. जगन्नाथ श्रीपत पटवर्धन
उपदेशक – श्री. रघूनाथ रामचंद्र पाठक

1 ऑगस्ट ला टिळक पुण्यतिथी निमित्त सभा होऊन सत्याग्रहाची घोषणा करण्यात आली. गोंदियात अहिंसात्मक चळवळ सुरू करण्यासाठी ऑगस्टची तरीख निश्चित करण्यात आली. तुमसरपासून 8 मैलावरील चिंचोलीच्या जंगलातील गवतावर कर लादल्याने या जंगलात गवत कापण्याचा सत्याग्रह करण्यात आला.[4]

5 ऑगस्ट रोजी (1930) सत्याग्रहींचा एक गट मूलजी धिक्काच्या बगीच्यातून निघाला. त्यांचे स्वागत रस्त्यात करण्यात आले. पाच हाजर लोकांचा जमाव सत्याग्रहींना निरोप देण्यासाठी रेल्वेस्टेशनवर उपस्थित होता. सत्याग्रहींचे नेतृत्व मोरेश्वर दामले कडे होते.[5]

सर्वत्र त्यांचे स्वागत पानसुपारीने होत होते. तुमसरला फलचंदजी अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. त्यात जगन्नाथ पटवर्धनांनी लोकांना जंगलसत्याग्रहाचे महत्व पटवून सांगितले.[6]

शुक्रवार 8 ऑगस्टला सकाळी आठ वाजता मोरेश्वर दामलेंच्या नेतृत्वात सत्याग्रही तुमसरवरून निघाले सकाळी अकरा वाजता (11 वा.) चिचोलीला पोहचले व बारा (12 वा.) वाजता जंगल कायदा मोडण्यासाठी जंगलाकडे रवाना झाले. त्यावेळेस बरेचसे पोलीस बंदोबस्ताकरिता ठेवले होते. तसेच हत्तीवर बंदुकीच्या गोळयांच्या पेटया ठेवल्या होत्या व जिल्हयातील डेप्युटी कमिश्नर, कप्तान सर्कल इन्स्पेक्टर व सबइन्स्पेक्टर हजर होते. एक वाजता आठ हजार दर्शकांसमोर हा जत्था जंगलात जाण्यासाठी उभा राहिला. या पथकाचे नेते यशंवत कोतवाल होते. एक मैल लांबीची मिरवणूक निघाली.

यात स्त्रियांही सामील होत्या. सरकारी जंगलातील गवत कापले म्हणून या सर्व सत्याग्रहींना पकडण्यात आले. त्यावेळेस जसानी पाठक व गोपीनाथ पटेल यांना अटक करण्यात आली. श्री. विनायक पेटकर व श्री. पळसुळे यांनी सत्याग्रहीतर्फे विनामुल्य वकिलीचे काम पाहिले, तर इतरांना कायद्यानुसार शिक्षा भोगावी लागली.[7]

### *दुसरे युध्द मंडळ :–*

डिक्टेटर– श्री. गिरधारीलाल शर्मा
मंत्री – श्री. सुखदेवजी अग्रवाल
सेनापती– श्री. जगन्नाथ श्रीपत पटवर्धन
सदस्य – श्री. यशवंत रामचंद्र कोतवाल

### *दुसरा जंगल सत्याग्रह :–*

दि. 11 ऑगस्ट ला दोन ठिकाणी सत्याग्रह चालू करून सरकारला आव्हान दिले गेले. चिंचोली येथे गण्पतलाल पांडे व मुर्दोली येथे श्री बन्सीलालच्या नेतृत्वाखाली (मुर्दोली हे गांव गोंदियापासून 17 मैलावर आहे) तेथे 11 वाजता सत्याग्रही पोहचले. त्यांचे स्वागत झाले. स्त्रियां व मुलांनीही यात भाग घेतला होता. सत्याग्रहींनी तेथील जंगलातील गवत कापल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.[8]

चिंचोली येथे गणपतलाल पांडेच्या नेतृत्वाखाली 9 सैनिकांनी त्याठिकाणी प्रवेश केला व 10 ऑगस्टला सत्याग्रह करण्यात आला. चिंचोलीच्या दुसऱ्या सत्याग्रहात श्री. गणपतलाल पांडे, मालगुजार रिसामा यांना अटक करण्यात आली.[9]

### *चिंचोली जंगल सत्याग्रहींची नांवे :–*

नायक :– श्री. गण्पतलाल पांडे, मालगुजार रिसमा.
स्वयंसेवक :– श्री. रामकृष्ण–आमगाव, श्री. अंबादास–आमगाव, श्री. नारायणराव–आमगाव, श्री. लटाऱ्या ईसरू रिसामा, श्री. श्रावण हन्ना हत्तीमरे, श्री. नरसैया सिवैया–गोंदिया, श्री. गुलाबचंद बिजराज अग्रवाल–गोंदिया, श्री. नारायणराव गोविंदराव–गोंदिया, श्री. हनुमानसिंह उम्मेदसिंह–गोंदिया.[10]

### मुर्दोली जंगल सत्याग्रहीची नांवे :–
नायक – श्री. बंशीलालजी अग्रवाल–गोंदिया.
स्वयंसेवक– श्री. सुंदरलाल खत्री–गोंदिया, श्री. रामनाथजी ब्राम्हण–गोंदिया, श्री. केसरीचंद्रजी – गोंदिया, श्री. जीलराजभाई–गोंदिया.

### तिसरा जंगल सत्याग्रह :–
1930 च्या दि. 12, 13, 14 व 15 ऑगस्ट रोजी चार ठिकाणी सत्याग्रह झाला.
1)साकोली :– तेलीनालाच्या जंगलात श्री. बेलझीभाई मेहताच्या नेतृत्वात गवत कापण्यात आले, त्यांना पकडण्यात आले.[11]
2)मुर्दोली :– येथील सरकारी जंगलात श्री. गोपाळरावजी बापट गोंदिया सह पाच सत्याग्रहींनी गवत कापले त्यांना अटक झाली.[12]
3)चोरखमारा :– वडेगाव जवळ चोरखमारा येथील सरकारी जंगलात श्री. बरजोरसिंह ठाकूर (तिरोडा) यांच्या नेतृत्वाखाली 11 सत्याग्रहींनी गवत कापले, त्यांनाही अटक झाली.[13]
4)चिंचोली :– येथे श्री. धीमतराय व्दारकादासांच्या (तुमसर) नेतृत्वाखाली 10 सत्याग्रहींनी गवत कापले, त्यांना अटक करण्यात आली.[14]
वरील चारही सत्याग्रह करणाऱ्या सत्याग्रहींची नावे पुढीलप्रमाणे आहे.

### 1)साकोली :– तेली नाल्याच्या सत्याग्रहीची नावे
नायक :– श्री. वेलजीभाई मेहता, गोंदिया.
स्वयंसेवक :– श्री. लक्ष्मीचंद्र जैन, गोंदिया, श्री. विठ्ठदासभाई, गोंदिया, श्री. बंसीलाल भादुपोते, गोंदिया, श्री. कल्याणजी, गोंदिया, श्री. नारायणजी, गोंदिया, श्री. भौरीलालजी, गोंदिया, श्री. मोहनलाल शर्मा, गोंदिया.

### 2)मुर्दोली सत्याग्रहींची नावे :–
नायक :– श्री. गोपाळरावजी बापट, गोंदिया.
स्वयंसेवक :– श्री. बिहारीलाल दुबे, गोंदिया, श्री. मार्तंड बापूजी लिमये, गोंदिया, श्री. धनराज बापूजी, गोंदिया, श्री. आत्माराम विठोबा, गोंदिया.

### 3)चोरखमारा येथील सत्याग्रहींची नावे
नायक :– श्री. बरजोरसिंह ठाकूर, तिरोडा.
स्वयंसेवक :– श्री. हगरू चांगो, तिरोडा, श्री. सोमा मधू, तिरोडा, श्री. छोटालाल सरजूराव, तिरोडा, श्री. कोंधा उंदऱ्या इजेवार, तिरोडा, श्री. रामदीन माताबदल, तिरोडा, श्री. लक्ष्मण दामा, तिरोडा, श्री. गणपतसिंह लक्ष्मणसिंह तिरोडा, श्री. सीतरू रामसिंह, तिरोडा, श्री. दशरथ गणपत, तिरोडा, श्री. तुळशीराम बकाराम, तिरोडा.
तिसरे युध्द मंडळ :–
डिक्टेटर :– श्री. सुखदेवजी अग्रवाल
मंत्री :– श्री. कृष्णा गोंदिंद पोफळी
सेनानायक :– श्री. जगन्नाथ श्रीपत पटवर्धन
सभासद :– श्री. यशवंत रामचंद्र कोतवाल[15]

### चौथा जंगल सत्याग्रह :–
तिसऱ्या युध्दमंडळाच्या नेतृत्वाखाली चौथा जंगल सत्याग्रह दि. 19 ऑगस्ट ला झाला. हे सत्याग्रह सात ठिकाणी करण्यात आले.
1)चिंचोली – श्री. जागोजी, तुमसर.
2)तेलीनाला (साकोली) – श्री. बाळकृष्ण लेले, भंडारा.
3)बळी मेंडकी :– श्री. कामताप्रसाद मिश्र, भंडारा.
4)वडेगांव चोरखमारा :– श्री. फंदीलाल मंगलसिंह, गोंदिया.
5)मुर्दोली :– श्री. रामलाल मंगलसिंह, गोंदिया.
6)सोनकुण्ड :– श्री. चैतराम मास्तर राजाभोज, मुंढरी.
7)मंगेझरी :– श्री. रामलाल जिन्दाबाद.[16]
वरील जंगल सत्याग्रहात सभागी झालेल्या सत्याग्रहींची नावे खालील प्रमाणे.

### 1)चिंचोली सत्याग्रहींची नावे.
नायक :– जागो लक्ष्मण
स्वयंसेवक :– श्री. महादेव नारायण साखी
वरील प्रमुख होते.

### 2)तेलीनाला सत्याग्रहींची नावे.
नायक :– बाळकृष्ण तुकाराम लेले, भंडारा.
स्वयंसेवक :– श्री. गोपाळराव देव, श्री. बाबूराव देव, श्री. मोरेश्वर व्यवहारे, श्री. निळकंठ नारायण खंडाळकर, श्री. नारायण किसनसिंह, गोंदिया, श्री. बिसन नरबद इंभतवार, श्री. मारोती पांडुरंग लोधी, श्री. रामप्रसाद शिवनारायण, श्री. गंगारामजी मुलचंद गोरण, आमगांव.

### 3)मुर्दोली सत्याग्रहींची नावे.
नायक :– श्री. रामलाल मंगलसिंह, गोंदिया.

स्वयंसेवक :– श्री. सदाशिव बापूजी, गोंदिया, श्री. रघुनाथ नागोराव, गोंदिया, श्री. बलदेवप्रसाद राधेलाल, गोंदिया, श्री. नारायण भिकाजी कुलकर्णी, गोंदिया.

***4)बळी मेंडकी सत्याग्रहींचे नावे.***

नायक :– कामताप्रसाद कन्हैयालाल, भंडारा.

स्वयंसेवक :– श्री. महावीर बैलू, गोंदिया, श्री. रघुनंदन गुराखन, गोंदिया, श्री. आसाराम जोधराम, गोंदिया, श्री. दादू नागो, गोंदिया.

***5)वडेगाव चोरखमारा सत्याग्रहांची नावे.***

नायक :– श्री. फुंदीलाल रम्भा, पालडोंगरी.

स्वयंसेवक :– श्री. ब्रजलाल फकीरा, पालडोंगरी, श्री. मारोती वारलू, पालडोंगरी, श्री. बालचंद्र सीताराम, पालडोंगरी, श्री. बैरम आत्माराम, पालडोंगरी, श्री. सीताराम रामसिंह, पालडोंगरी, श्री. सोन्या गोंविदा, तिरोडा, श्री. सुक्या हसनसिंह, तिरोडा, श्री. तुलसीराम बकाराम, विहीरगाव, श्री. राघो बका, विहीरगाव.

फक्त नायकाला अटक करून बाकीच्यांना सोडण्यात आले.

***6)सोनकुण्ड सत्यांग्रहींची नावे.***

नायक :– श्री. चैतराम अनंतराम राजाभोग, मुंढरी.

स्वयंसेवक :– श्री. रामा गायधनी, मुंढरी, श्री. राजाराम कापसे, मुंढरी, श्री. कारू मंगरू हुके, मुंढरी, श्री. गणपत तुकाराम बोरकर, मुंढरी, श्री. विरेंद्र नंदलाल पुरी गोसावी, मुंढरी, श्री. नाथू मारोती पराते, मुंढरी, श्री. विठोबा नागो सोनकुसरे, मुंढरी, या सर्वांना अटक झाली.

***7)मंगेझरी सत्याग्रहींची नावे.***

नायक :– श्री. रामलाल जिन्दाबाद.

स्वयंसेवक :– श्री. कवडबा उरवूर्वा, जिन्दाबाद, श्री. रामा गोंविदा, जिन्दाबाद, श्री. प्रेमलाल दहू, जिन्दाबाद, श्री. लाडकू दुगा महाजन, जिन्दाबाद, श्री. बापू राघोबा, जिन्दाबाद, सर्वांना अटक झाली.

***पाचवा जंगल सत्याग्रह :–***

दि. 25, 26, 27 ऑगस्टला 20 ठिकाणी सरकारी जंगलात सत्याग्रह करण्याची घोषणा 21 ऑगस्ट रोजी करण्यात आली व याच दिवशी गोंदिया जिल्हयातील दोन मोठया गांवात सरकारी अधिकाऱ्यांनी अशी दवंडी दिली की, जे लोक सत्याग्रहात सहभागी होतील, त्यांना कोडे मारले जातील. सेनापती श्री. जगन्नाथ पटवर्धन यांनी सरकारचे आव्हान स्वीकारून जोशपूर्ण भाषण केल्यामुळे त्यांना पकडून एक वर्षाची शिक्षा देण्यात आली.

***सत्याग्रहाची सुरूवात –***

| ***नायकाचे नाव*** | ***ठिकाण*** |
|---|---|
| 1.श्री. गंगाराम | मुर्दोली |
| 2.श्री. दादू सावकार | बळी मेंडकी |
| 3.श्री. नारायणसिंह ठाकूर | तेलीनाला |
| 4.श्री. ज्ञानदास बाबा | फुरकाबोडी |
| 5.श्री. गोमाजी | निलागोंदी |
| 6.श्री. नन्दूलाल | मुंढरी |
| 7.श्री. सीताराम | परसोडी |
| 8.श्री. दशरश मांगो | मंगेझरी आंबेनाला |
| 9.श्री. ढेकलपुरी | बोदलकसा |
| 10.श्री. लोधबाजी | चोरखमारा |
| 11.श्री. विठोबा नागो | सोनकुंड |
| 12.श्री. बलदेव प्रसाद | देवलगाव बांध |
| 13.श्री. तानबासाव चमरूसाव | किसनपूर |
| 14.श्री. एकनाथ चौधरी | चांदी हुडकी |
| 15.श्री. नारायण गोपाल बारई | कौलवाडा कोथूरनी |
| 16.श्री. कृष्णराव दत्ते | सीतेपार माटोरा |
| 17.श्री. गोपालराव हडके | देवनारा |
| 18.श्री. बालाजी मारोती | तेलीपचारा |
| 19.श्री. लक्ष्मण गणे | चिचोली |
| 20.श्री. स्वयंसेवकानी | चुलतडोह |

वरील सत्याग्रहात 100 सत्याग्रहींनी भाग घेतला त्यापैकी 45 जणांना अटक करण्यात आली.[17]

***सहावा जंगल सत्याग्रह :–***

डिक्टेटर :– श्री. महादेव बलदेव जोगळेकर

मंत्री :– श्री. कृष्णा गोंविंद पोफळी
सेनानायक :– श्री. केशवराव इंगले
सभासद :– श्री. पन्नालाल दुबे

हा सहावा जंगल सत्याग्रह 28 ठिकाणी झाला. यात 84 लोकांनी भाग घेतला व 10 जणांना पकडण्यात आले. हा सत्याग्रह पुढील ठिकाणी करण्यात आला. किटाडी, कौलेवाडा, कोथुरना, चांदी हुडकी, माटोरा, सितेपार, तेली नाला, मुर्दोली, बळीमेंडकी, देवलगाव बांध, बडेगांव स्टेशन, पिंपलगाव, दहेगाव, पालांदूर, किटाळी, उमरझरी, नीलागोंदी, पुरकाबोडी, सौंदड, मंगेझरी, चोरखमारा, बोदलकसा, किसनपूर, सोनकुंड, चांदपूर, चुलतडोह, पचारा, चिंचोली, गोबरवाई, पिटेसूर, देवनारा.[18]

### सातवा जंगल सत्याग्रह :–

दि. 15 सप्टेंबर रोजी 32 ठिकाणी सरकारी जंगलात सत्याग्रह करण्यात आला. यात 108 सत्याग्रहींनी भाग घेतला. त्यापैकी 17 जण पकडण्यात आले. पुढील गावात हा सत्याग्रह झाला. तिडका, सालेभट्टी, पुरकाबोडी, सौंदड, गुमगांव, भिवाखिडकी, देवलगावबांध, बोदलकसा, खेरखमारा, मंगेझरी, सोनकुंड, किसनपूर, मुर्दोली, बळीमेंडकी, वडेगाव स्टेशन, पालांदूर, किटाडी, गौरीडोह, गरूडपहाडी, तेलीनाला, कवलेवाडा, चांदी हुडकी, माटोरा, निष्टी, चांदपूर, पचारा, चिंचोली, कवलेवाडा, गोबरवाही, पिटेसूर, देवनारा, चूलतडोह इत्यादी.[19]

### पाचवे युध्द मंडळ :–

डिक्टेटर :– श्री. बिहारीलाल शर्मा
मंत्री :– श्री. कृष्ण गोंविद पोफळी
सेनानायक :– श्री. पन्नालाल दुबे
सभासद :– श्री. रघुनाथदास शर्मा

### आठवा जंगल सत्याग्रह :–

दिनांक 6 ऑगस्ट 1930 रोजी सत्याग्रह करण्यात आला. हा सत्याग्रह यशस्वी झाला. फक्त मुर्दोली व चिंचोली या गावात हा सत्याग्रह यशस्वी झाला नाही.

दि. 6 ऑक्टोबर 1930 ला जिल्हा युध्दमंडळाने 12 ठिकाणी सामुदायिक व 14 ठिकाणी व्यक्तिगत सत्याग्रह करण्याचे ठरविल्याने सत्याग्रहींचा एक जत्था कुऱ्हाडी गावात जाणार होता. म्हणून तेथे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. पोलिसांनी जान्या व तिम्या या दोन भावांना व्यवस्था करण्यासाठी बिऱ्हाडावर बोलाविले. परंतु ते न गेल्याने त्यांना धमकावण्यात आले. तर तिम्या गोवारीच्या पोटात पोलिसाने भाला खुपसला तेव्हा त्याचा भाऊ जान्या तेथे गेला असता त्याच्याही पोटात भाला खुपसला. तिम्या लगेच मरण पावला तर जान्याचे मात्र गोंदियाच्या दवाखान्यात निधन झाले. या पोलिसी अत्याचाराचा लोकांनी तीव्र निषेध केला. सर्वत्र हडताळ पाळला. त्यांना शहीद संबोधून त्यांच्या कुटुंबासाठी रू. 508/– फंड गोळा करून त्याव्दारे 5.56 एकर जमीन घेऊन त्यांना देण्यात आली.[20]

दि. 10 ऑक्टोबर 1930 ला प्रांतीय युध्दामंडळाचे डिक्टेटर श्रीमती अनुसयाबाई काळे आणि मंत्री श्री. घुले चौकशीसाठी आले तेव्हा कुऱ्हाडी गावात निषेधसभा घेण्यात आली. मृत्यूपूर्वी शहीद जान्याने पन्नालाल दुबेकडे पोलिसाने दोघानांही विनाकारण पोटात भाला खुपसून मारल्याचे सांगितले.

यावर पोलीस अधिकाऱ्यांने मात्र 22 ऑक्टोबर रोजी आपल्या बचावासाठी ''जंगल सत्याग्रहानिमित्त पोलीस गावात गेले. तेव्हा एका हेडकॉन्स्टेबलने तेथील लोकांना कामासाठी बोलावले असता त्यांनी येण्यास नकार दिला तेव्हा पोलिसाने शिबीगाळ करताच नागरिकांनी त्याला मारले, नंतर पोलीस नागरिंकात मारपीठ होऊन दोन नागरिक व आठ पोलीस जखमी झाले. म्हणून पोलिसांनी आपल्या बचावासाठी कारवाई केल्याचे सांगितले.'' पोलिसांच्या अत्याचारामुळे कुऱ्हाडी गावात सर्वत्र दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.[21]

### निष्कर्ष :–

अशाप्रकारे सविनय कायदेभंग चळचळीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून भंडारा जिल्हयातील अनेक लहान मोठया खेडयांमध्ये जंगल सत्याग्रह करण्यात आला. जंगल कायदा हा स्थानिक नागरिकांच्या हिसंबंधांच्या विरोधात होता. त्यांचे परंपरागत हक्क नाकारणारा व अन्यायी होता. या कायद्याने स्थानिकांवर बंधने लादली होती. याचा परिणाम त्यांच्या उदरनिर्वाहावर व जीवनावर विपरीत घडून आला होता. त्यामुळे जंगल कायद्यांचा विरोध या माध्यमातून करणे योग्य होते. जंगल सत्याग्रह हा ब्रिटिश सत्तेच्या धोरणाचा व कार्याचा निषेध होता.

याचा अर्थ भंडारा जिल्हयातील नागरिकांनी स्वतःच्या स्वार्थापोटी जंगल सत्याग्रहात सक्रिय सहभाग घेतला होता असा लावणे सत्याग्रहींच्या उद्देशावर शंका घेणारा व त्यांच्या त्यागाची, बलिदानाची अवहेलना करण्यासारखे ठरेल. या सत्याग्रहींच्या मनात राष्ट्रभक्तीची भावना खच्चून भरली होती. या भावनेमुळे तसेच राष्ट्रीय चळवळीच्या कार्यक्रमाचा एकभाग म्हणून त्यांनी जंगल सत्याग्रहाचे आयोजन केले. त्यात सक्रिय सहभाग घेतला. शासनाने त्यांच्या वर अनन्वीत अत्याचार केलेत, दहशत निर्माण केली पण हे सत्याग्रही आपल्या ध्येयापासून दुरावले नाहीत. असे होणे हा त्यांच्यातील एक राष्ट्र भक्तीताच परिणाम होता.

या सत्याग्रहामुळे राष्ट्रीय चळचळीला बळ प्राप्त झाले. या बळामूळेच ही चळचळ अधिक परिणामकारी झाली. या परिणामकारकते मुळेच 1947 मध्ये भारताला स्वांतत्र मिळाले. यात भंडारा जिल्हयातील जंगल सत्याग्रहा प्रमाणेच अन्य सत्याग्रह व चळवळीचा ही मोलाचा वाटा होता. हे प्रतिबिंबीत करण्यासाठी हा शोधनिबंध सादर आहे.

*संदर्भ सूचीः–*

| | | |
|---|---|---|
| 1)डॉ. श. गो. कोलारकर | – | विदर्भाचा इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ,1997, पृ. 128 |
| 2)हांडियेकर डॉ. वि. ना. | – | भंडारा जिल्हयातील स्वातंत्र्य लढा– ऑगष्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, 1992, पृ. 44 |
| 3)डॉ. कोलारकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 139 |
| 4)कित्ता व हांडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 139, पृ. 49, 50 |
| 5)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 139, 50 |
| 6)डॉ. हांडीयेकर व | – | पूर्वउल्लेखित, पृ. 50 |
| दिनेशकुमार नखाते | – | भंडारा जिल्हा गौरव, गोंदिया, 2000, पृ. 51 |
| 7)डॉ. कोलारकर व डॉ. हंडियेकर | – | पूर्व उल्लेखित, पृ. 138,139, पृ. 50 |
| डॉ. दमयंती पाठक | – | वैदर्भिय महिलांचे स्वांतत्र संग्रामातील सहकार्य,मंगेश प्रकाशन, नागपूर, 2003, पृ. 128 |
| 8)डॉ. कोलाकर व | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 50 |
| डॉ. हंडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 50 |
| 9)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 51 |
| 10)डॉ. हांडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 51 |
| 11)डॉ. कोलारकर व डॉ. हंडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 51 |
| 12)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 51 |
| 13)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 51 |
| 14)डॉ. हांडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 52 |
| 15)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 53 |
| 16)डॉ. कोलारकर व | – | पूर्वउल्लेखित, पृ. 140, पृ. 53 |
| डॉ. हांडियेकर | – | |
| 17)डॉ. हांडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 54, 55 |
| 18)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 56 |
| 19)कित्ता | – | पूर्वउल्लेखित, पृ. 56 |
| 20)डॉ. हांडियेकर व दमयंती पाठक | – | पूर्वउल्लेखित, पृ. 58, पृ. 130 |
| 21)डॉ. हांडियेकर | – | पूर्वउल्लेखित, पृ. 58 |